# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.१७/०८/२०२१

**प्रेसनोट**

शासनाने दिलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे.

दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी महानगरपालिकेतील दिव्यांग तसेच अंथरुणाला खिळलेल्या नागरिकांच्या निवासस्थानी जाऊन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतील कर्मचाऱ्यांमार्फत एकूण **६०१** नागरिकांचे कोव्हीड-१९ प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले.

त्याचप्रमाणे महिलांसाठी नियोजित केलेल्या विशेष कोव्हीड-१९ प्रतिबंधक लसीकरणामध्ये आजपर्यंत एकूण **१२४९** महिलांचे लसीकरण करण्यात आले आहे.

**दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ रोजी** फक्त दिव्यांग तसेच अंथरुणाला खिळलेल्या नागरिकांचे त्यांच्या निवासस्थानी जाऊन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील कर्मचाऱ्यांमार्फत **'कोवॅक्सीन'** लसीच्या **पहिल्या डोसचे** लसीकरण करण्यात येईल.

याव्यतिरिक्त महानगरपालिकेच्या **सर्व लसीकरण केंद्रांवरील लसीकरण पूर्णतः बंद राहील.**

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**